दैनिक
# लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार ४ ऑक्टोबर २०२५ | अंक २८३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

**आजचा दिनविशेष**
१९४३ : दुसरे महायुद्ध – युनायटेड स्टेट्सने सॉलोमन बेटांवर कब्जा केला.




# आता माघार नाही., जरांगे पाटलांकडून दसरा मेळाव्यात नव्या लढाईचा एल्गार, सरकारला घाम फोडणाऱ्या ८ मागण्या

**७० हजार रुपये शेतकऱ्यांना हेक्टरी भरपाई द्या. कॅश पिकं जळाले ना. ७० हजार हेक्टरी द्यायचे**









## जरांगे पाटील यांच्या मागण्या?

सरकारला जाहीपणे सांगतो. मराठवाड्यात आणि लगतच्या जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा. त्याशिवाय माघार नाही. दिवाळीच्या आतच करा. सरकारने दिवाळीच्या आत ओला दुष्काळ जाहीर करायचा आहे, अशी पहिली मागणी त्यांनी सरकारकडे केली आहे.७० हजार रुपये शेतकऱ्यांना हेक्टरी भरपाई द्या. कॅश पिकं जळाले ना. ७० हजार हेक्टरी द्यायचे. मनोज जरांगे बोलतो ते करतो. आता मात्र शेतकऱ्यांची खरी फाईट सुरु झाली. आता समजायचं तुमच्या पदरात पडलं. आरक्षण पडलं ना. तुम्ही नीट डोकं लावून ऐका, असं यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.शेतकऱ्यांना सरसकट ७० हजार रुपये द्यायचे. ज्यांचे शेत वाहून गेले नाही पण शेतात पाणी साचले आहे, पिकं जळाली आहेत त्यांनाही सत्तर हजार रुपये मिळाले पाहिजेत. नदीच्या शेजारचे वावर वाहून गेले. पिक वाहून गेले, त्यांना १ लााख ३० हजार रुपये भरपाई द्या. आपलं असंच असतं. तज्ज्ञ नाही. अभ्यासक नाही. असंही पाटील यांनी यावेळी म्हटलं आहे.ज्याचं शेत वाहून गेलं. पिक गेलं त्याला १ लाख ३० हजार द्या. ज्याचे जनावरे वाहून गेले, बाजरी, सोयाबीन वाहून गेले. त्यांना शेतकरी सांगेल तसा पंचनामा करून १०० टक्के भरपाई दिली गेली पाहिजे. घर पडलं. शेळ्या वाहून गेल्या, भांडी वाहून गेले, सोनं वाहून गेलं. नळ्या वाहून गेल्या, सर्व वाहून गेले तेवढे पैसे द्यायचे.शेतकऱ्याच्या उसातून १५ रुपये कापायचे ठरवले आहेत, त्यातला एक रुपयाही कापायचा नाही.शेतीला नोकरीचा दर्जा द्या. तुम्ही म्हणता नोकरी नाही. १० एकरच्या आत शेती करेल त्याला १० हजार रुपये महिना द्या, अशी मागणीही यावेळी जरांगे पाटील यांनी केली आहे. पीक विम्याला तीन ट्रिगर बसवले ते उठवा. पीक विमा सरसकट सर्व शेतकऱ्यांना द्या

# शिरापुर धुमाळ येथील माता माऊली युवक व वडीलधारी मंडळींचे कौतुकास्पद

**नारायणगड दसरा मेळाव्याच्या यशस्वी आयोजनात व मराठा आरक्षण लढ्यासाठी ठाम पाठिंबा**



शिरापुर धुमाळ (ता शिरूर का) येथील माता माऊली युवक व वडीलधारी मंडळी यांनी श्री क्षेत्र नारायणगड येथे आयोजित दसरा मेळाव्याच्या आयोजनात महत्त्वपूर्ण योगदान दिले. हजारो समाज बांधवांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या मेळाव्यासाठी उत्कृष्ट व्यवस्थापन करण्यात आले होते. विशेषत भोजन व्यवस्थेची उत्तम सोय करून उपस्थितांचा मनापासून पाहुणचार करण्यात आला.या उपक्रमामुळे शिरापुर धुमाळ गावाचे सामाजिक भान व एकतेचे दर्शन घडले. गावातील युवक व ज्येष्ठांनी मिळून केलेले नियोजन कौतुकास पात्र ठरले आहे. समाजासाठी निस्वार्थ भावनेने केलेली ही सेवा खरंच प्रेरणादायी आहे.याशिवाय, मराठा आरक्षण लढ्याच्या अग्रस्थानी असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला शिरापुर धुमाळ येथील माता माऊली युवक मंडळ वडीलधारी मंडळी यांनी वेळोवेळी ठाम व भक्कम पाठिंबा दर्शवला आहे. या सामाजिक लढ्यात वेळोवेळी मिळत असलेली समाजाची साथ हि कौतुकास्पद आहे शिरापुर धुमाळ हे गाव एकात्मतेचे व समाज भिमुखतेचे प्रतिक आहे,

# मस्साजोग येथे महिलेचा विनयभंग करून दिली जिवे मारण्याची धमकी.



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील मस्साजोग, ता. केज. जि. बीड येथे 65,वर्षीय महिलेचा विनयभंग करून जिवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची घटना दि, 30/9/2025 मंगळवार,रोजी घडली असून अरोपी विरोधात केज पोलिस स्टेशनला गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तालुक्यातील मस्साजोग ता. केज. जि. बीड. येथील एका 65, वर्षीय महिलेचा वाईट हेतूने हाताला धरून ओढत घरात चल म्हणून विनयभंग करण्यात आला सदरील महिला आपल्या राहत्या घरासमोरील मोकळ्या जागेतील गवत काढत असताना आरोपी अनंत मंचकराव देशमुख तेथे आला व माझ्या हाताला धरून वाईट हेतूने घरात चल म्हणून मला ओढू लागला त्यावेळी मी आरडा ओरड केली असता माझे पती तेथे धावत आले त्यावेळी मला व माझे पतीला तुझ्याकडे बघतो म्हणून.. जीवे मारण्याची धमकी देवून पळून गेला. याप्रकरणी केज पोलिस स्टेशनला अरोपी विरोधात महिलेच्या फिर्यादी वरून Bns, 2025,74,Bns, 2025,,352,Bns, 2025,351(2) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून केज पोलिस स्टेशनचे प्रभारी पी. आय. उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली हेड कॉन्स्टेबल बाबासाहेब सानप हे पुढील तपास करत आहेत.

# कु.प्रियांका गुरव उत्कृष्ट नवदुर्गा विद्यार्थी पुरस्काराने सन्मानित



पुणे/प्रतिनिधी:–पुणे येथील भारती विद्यापीठ, अभिजित दादा कदम मित्र मंडळ व प्रतिष्ठान पुणे यांच्या वतीने धरु नवदुर्गा पुरस्कार देण्यात येतो याही वर्षी दिनांक २ ऑक्टोबर २०२५ यांच्या वतिने भारती विद्यापीठ पुणे अभिजीत दादा कदम मित्र मंडळ व प्रतिष्ठान ट्रस्ट कोथरूड कोथरूड येथील आयोजित नवदुर्गा पुरस्कार सोहळा संपन्न झाला या बाबत सविस्तर माहिती आशी कि भारती यांच्या वतिने अभिजित दादा कदम व प्रतिष्ठान पुणे यांच्या वतिने चित्रकार कु. प्रियांका चंद्रहास गुरव हिला उत्कृष्ट नवदुर्गा गुणगौरव विद्यार्थिनी म्हणून पुरस्काराने सन्मानित करण्यात आले या पुरस्काराचे सर्वत्र कौतुक होत असुन प्रियांका गुरव वर सर्व स्तरातील लोकांमधुन अभिनंदन होत आहे,यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड श्री रामचंद्र कदम उर्फ चंदू शेठ नगरसेवक पुणे महानगरपालिका हे होते तर खालील मान्यवर उपस्थित होते या मध्ये डॉ काकासाहेब जाधव, डॉ सुहास मोहिते, प्रा.सागर खळतकर ,प्रा सुनील पवार , श्री सागर सुबराव कदम , आदि मान्यवर उपस्थित होते

# वसुंधरा पायी दिंडी २०२५ चे केज शहरात जंगी स्वागत

केज/प्रतिनिधी जगतगुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी महाराज यांची दिंडी दिनांक २८ सप्टेंबर २०२५, मराठवाडा येथील श्रीक्षेत्र माउली माहेर जिल्हा परभणी येथे वसलेल्या जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी स्थापित रामानंद संप्रदाय, मराठवाडा (परभणी) उपपीठाहून पायी दिडीचे प्रस्थान २८ सप्टेंबर २०२५ रोजी झालेले आहे. या पायी दिंडी मध्ये हजारो भाविक परभणी पासून श्रीक्षेत्र नाणीजधाम (रत्नागिरी) पर्यंत शेकडो किलोमीटरचा प्रवास पायी चालून जाणार आहेत. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या २१ ऑक्टोबर २०२५ रोजी ५९ वा वाढदिवस येत आहे. रामानंद संप्रदायाचे मुख्यपीठ नाणीजधाम येथे हा उत्सव या दिवशी अनेक वर्ष साजरा केला जातो. त्यादिवशी हि दिडी नाणीजधाम येथे दाखल होणार आहे.मराठवाडा (परभणी) उपपीठ सोबतच तेलंगणा उपपीठ, उत्तर महाराष्ट्र (नाशिक) उपपीठ, पूर्व विदर्भ(नागपूर) उपपीठ, मुंबई उपपीठ (वसई), पश्चिम महाराष्ट्र (पुणे) व गोवा या ७ उपपिठाहून देखील अश्याच प्रकारे पायी दिंड्या निघणार आहेत. या दिंडीला वसुंधरा पायी दिंडी असे नाव देण्यात आले आहे.या दिडीतून, सध्या अत्यंत जिकरीच्या पण



तेवढ्याच दुर्लक्षित असलेल्या ग्लोबल वॉर्मिंग या विषयावर प्रकाश टाकला जात आहे. यावर केवळ संदेशच न देता त्यांच्या कृतीतूनही संदेश देण्याचा प्रयत्न केलेला आहे. हजारो लोकांची खाण्या पिण्याची, राहण्याची, मलमूत्र विसर्जनाची, अंघोळीची सोय करताना पर्यावरणाला काहीही हानी होणार नाही याची काळजी आयोजकांकडून घेतली जात आहे. मागे कचरा होणार नाही याची खबरदारी घेण्यासाठी विशेष सेवेकरींचे पथक या दिंडीत सामील आहे. सोबत टॉयलेट व्हॅन देखील तैनात आहे, तसेच सोबत पिण्याचे पाणी, आणि स्वच्छतेसाठी लागणारे पाणी घेऊन २ स्वतंत्र टँकर्स देखील दिंडी सोबत कायम सज्ज आहेत. त्याचसोबत या दिंडीच्या माध्यमातून दरदिवशी वृक्षारोपण देखील केले जात आहे.विशेष म्हणजे हि दिंडी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने रस्त्याच्या एका बाजूने, एका रांगेत, एका तालात आणि लयीत, त्यांच्या सांप्रदायिक गजरावर चालत पुढे सरकत आहे. त्यांच्या वेशभूषा सुद्धा एका रंगसंगती मध्येच आहेत. एका तालावर चालताना वर्दळीच्या भागात हि दिंडी ग्लोबल वॉर्मिंगवर संदेश देताना आढळून आली. अश्याप्रकारे वसुंधरा पायी दिंडीचे हे सलग तिसरे वर्ष आहे आणि तेही नवीन २ दिंडींसह, जी एक वाखाणण्याजोगी बाब आहे. यातून संस्थानाचा एक चांगला उपक्रमच नाही तर त्यांचे सातत्य आणि चिकाटीहि दिसून येते.या दिंडीमध्ये सहभागी भाविकांची सुद्धा विशेष काळजी घेतली जात आहे असे आढळून आले, कारण वेळेच्या वेळी सकस आहार पुरवला जात आहे, सोबत दिंडीमध्ये संस्थानाची एक ऍम्ब्युलन्स चालताना आढळून आली. ज्यात एक वैद्यकीय पथकहि सेवा देताना दिसून आले आहे. अशी हि आगळीवेगळी पायीदिंडी ज्यात फक्त मध्यमवयीनच नाही तर युवा–युवती, महिला–पुरुष असे सर्व वयोगटाचे आणि सर्व सामाजिक वर्गातले भाविक दिसून आले.जगदगुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजींच्या प्रेरणेने अनेक समाजपयोगी उपक्रम राबवले जात आहेत, जसे महामार्गावरील ऍम्ब्युलन्स सेवा, मरणोत्तर देहदान, मरणोत्तर अवयव दान, गरीब मुलांसाठी मोफत उइडए बोर्डचे शिक्षण, सर्व जातीपंथांच्या
मुला–मुलींसाठी मोफत वेदपाठशाळा, रक्तदान, व्यसनमुक्ती, आपत्कालीन सेवा, दुर्बल घटक पुनर्वसन या आणि अश्या अनेक उपक्रमांसाठी रामानंद संप्रदाय नेहमीच ओळखले गेला आहे. त्यांच्या या विविध समाजहितोपयोगी उपक्रमासाठी देखील समाजात विविध स्तरांवर यांचे कौतुक होत आहे.यासोबत दुग्धशर्करा योग म्हणजे हल्लीच घोषित करण्यात आलेली सरकारी योजना– मएक पेड माँ के नाम:, जी या सलग ३ वर्षे सुरू असलेल्या वसुंधरा पायी दिंडीच्या पर्यावरणसंरक्षणाच्या प्रयत्नांना जोड देते. म्हणूनच विशेष कौतुकाची बाब म्हणजे आता रामानंद संप्रदायाने सरकारच्या या योजनेत सुद्धा हिरीरीने आणि सक्रिय सहभाग घेतला आहे. या दिंडींदरम्यान शेकडोंच्या संख्येने वृक्ष लागवड करण्याचा मानस पूज्यपाद जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेतून करण्यात आला आहे. केज मध्ये या दिंडीचे दुपारच्या जेवणाचे नियोजन व स्वागत करण्यात आले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ४ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## 'हा' ब्लड ग्रुप असणाऱ्यांना हार्ट अटॅकचा सर्वात जास्त धोका, तुमचा रक्तगट किती सुरक्षित?



मचा रक्तगट कोणता आहे यावरून तुम्हाला कोणते आजार होऊ शकतात किंवा तुम्हाला कोणत्या आजाराचा धोका आहे हे समजू शकते. रक्तगटाच्या आधारे शास्त्रज्ञांनी हार्ट अटॅकचा धोका किती आहे यावर भाष्य केले आहे. एका अभ्यासानुसार O रक्तगट असलेल्या लोकांनी हृदयविकाराचा धोका कमी असल्याचे समोर आले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे जगात जवळपास 42 टक्के लोकांचा रक्तगट हा O आहे. या लोकांना हार्ट अटॅकचा धोका इतरांच्या तुलनेत कमी आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. समोर आलेल्या अभ्यासानुसार O रक्तगट असलेल्यांनाही हृदयविकाराचा धोका कमी आहे. मात्र A, B आणि AB रक्तगट असलेल्या लोकांना जास्त धोका असतो. हाय कोलेस्ट्रॉल, उच्च रक्तदाब आणि तणाव असलेल्या लोकांना हृदयविकाराचा धोका जास्त असतो असं बोललं जात होतं, मात्र आता नवीन अभ्यासानुसार रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉल सारख्या घटकांव्यतिरिक्त रक्तगटही हृदयविकाराच्या जोखमीवर परिणाम करतो. O रक्तगट असलेल्यांना धोका कमी का असतो?

TOI ॲथेरोस्क्लेरोसिस जर्नलमध्ये एक अहवाल प्रकाशित झाला आहे. यातील माहितीनुसार रक्तगट A, B किंवा AB असलेल्या लोकांना O रक्तगट असलेल्यांपेक्षा हृदयविकाराचा धोका जास्त आहे. हा धोका 6% ते 23 % जास्त आहे. तर O रक्तगट असलेल्यांना हा धोका कमी आहे. याचे कारण म्हणजे O रक्तगटामध्ये रक्त गोठवणारे घटक व्हॉन विलेब्रँड फॅक्टर आणि फॅक्टर VIII कमी प्रमाणात असतात. तसेच या रक्तगटाक कोलेस्टेरॉलची पातळीही कमी असते. त्यामुळे या लोकांना धोका कमी असतो.

रक्तगटाता स्ट्रोकच्या धोक्याचाही परिणाम

या अभ्यासात असेही समोर आले आहे की, रक्तगट हा स्ट्रोकच्या धोक्यावरही परिणाम करतो. A रक्तगट असलेल्यांना 60 वर्षांआधी स्ट्रोकचा धोका जास्त असतो, तर O रक्तगट असलेल्यांना धोका कमी असतो. थ्रोम्बोसिस अँड हेमोस्टेसिस जर्नलमधील एका अहवालानुसार मधुमेह नसलेल्या लोकांमध्ये AB रक्तगट असलेल्यांना O रक्तगट असलेल्या लोकांपेक्षा स्ट्रोकचा धोका 1.6 ते 7 पट जास्त होता.

रक्तगट का महत्त्वाचा असतो?

रक्तगट कोणता आहे हे तुमच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. रक्तातील अँटीजेन्स रक्त गोठण्यावर परिणाम करतात. वेगवेगळ्या रक्तगटांमध्ये वेगवेगळे अँटीजेन्स असतात. O रक्तगट नसलेल्या लोकांमध्ये फॅक्टर VIII आणि व्हॉन विलेब्रँड फॅक्टरचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे वेगाने रक्त गोठते. तसेच यामुळे रक्त प्रवाह मंदावतो. त्यामुळे रक्तगट महत्त्वाचा आहे.

# अतिवृष्टीमुळे घरांची पडझड – पंचनाम्यासाठी तलाठ्यांची टाळाटाळ

### अँगल कॅमेऱ्यात फोटो काढून टाका – तलाठी; प्रत्यक्ष पाहणी करा – मुळुकवाडी ग्रामस्थांची मागणी : डॉ. गणेश ढवळे

लिंबागणेश :– (दि.०२) बीड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची घरे कोसळून अनेक कुटुंब बेघर झाली आहेत. पण या नुकसानग्रस्तांना मदत मिळण्यासाठी आवश्यक असलेले पंचनामे महसूल विभागाकडून करण्यात टाळाटाळ होत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. तलाठ्यांचे विचित्र उत्तर – "फोटो काढून टाका" मुळुकवाडी येथील शहाबाई बाबुराव ढास यांचे मातीच्या घराची भिंत १५ दिवसांपूर्वी पावसामुळे कोसळली. त्यांचे मुलगे गोवर्धन ढास यांनी याबाबत तलाठ्यांना फोन केला असता तलाठ्यांनी "अँगल कॅमेऱ्यात फोटो



काढून पाठवा" असे उत्तर दिले. मात्र "आमच्याकडे अँगल कॅमेरा नाही" असे सांगूनही पंचनाम्यासाठी कोणीही आले नाही. त्याचप्रमाणे बाजीराव ढास यांच्या घराची दगडी भिंत पावसामुळे कोसळली, त्यांनीही फोन करून कळवले तरी उत्तर तेच मिळाले. तर अशोक पिंपळे यांनी त्यांच्या दुकानात पाणी साचल्याचे फोटो काढून पाठवले तरी कोणतीही दखल घेण्यात आली नाही. ग्रामस्थांचा संताप – "प्रत्यक्ष पंचनामे करा" "घरांची पडझड झाली आहे, फोटोवर काय विश्वास ठेवायचा? अधिकारी प्रत्यक्ष येऊन पंचनामे करावेत" अशी मागणी शहाबाई ढास, गोवर्धन ढास, बाजीराव ढास, अशोक पिंपळे आदी ग्रामस्थांनी केली आहे. "पंचनामे न करता मदत कशी मिळणार?" – डॉ. गणेश ढवळे वारंवार संपर्क साधूनही तलाठी पंचनाम्यासाठी येत नाहीत. त्यामुळे ग्रामस्थ प्रशासनाच्या दारात भटकत आहेत. "पंचनामे न करता नुकसानग्रस्तांना मदत मिळणार कशी?" असा थेट सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी उपस्थित केला असून तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना याबाबत तक्रार केली आहे. जवाबदारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या महसूल यंत्रणेवर ग्रामस्थांचा संताप उसळला आहे. मुलाबाळांसह उघड्यावर रात्र काढणाऱ्या या कुटुंबांना तातडीची मदत मिळणे गरजेचे आहे, अशी मागणी होत आहे.

# श्री रेणुका देवी संस्थान कडून पूरग्रस्तांसाठी एक कोटीचा निधी जाहीर –जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची घोषणा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट माहूर : मराठवाडा सततच्या अतिवृष्टीमुळे अक्षरशः हादरला आहे. नदी-नाले वाहत आहेत, शेतजमिनी खरडून गेल्या आहेत, शेतकऱ्यांचे पिकं आणि स्वप्न चिखलात गाडले गेले आहेत. शासनाकडून मदतीचे आवाहन होत असताना माहूरगडावरील श्री रेणुका देवी संस्थानाने पुढाकार घेतला असून दुष्काळग्रस्त आणि पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी एक कोटी रुपयांचा निधी जाहीर केल्याची माहिती माहूर येथील विश्रामगृहावर झालेल्या पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दि.३०-सप्टेंबर रोजी दिली. हा निधी फक्त आर्थिक मदत नाही, तर शेतकऱ्यांच्या



वेदनेत देवही सामील आहे, याचा स्पष्ट संदेश देणारा ठरला आहे.याआधी शिर्डी-साई, शेगाव गजानन, तुळजापूर भवानी या देवस्थानांनी शासनाच्या मदतीला प्रतिसाद दिला होता. माहूरगड संस्थानाच्या पुढाकाराने ग्रामीण शेतकरी वर्गाला थोडासा दिलासा मिळणार आहे. दरम्यान, जिल्ह्यातील महसूल विभागाने एक दिवसाचा कर्मचाऱ्यांचा पगार मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी दिला असून, तब्बल २ कोटी ५० लाख रुपये जमा झाले आहेत. जिल्हाधिकारी कर्डिले यांनी एनजीओ आणि इतर संस्थांना देखील आपत्तीच्या काळात सहाय्यता निधी शासनाकडे सुपूर्द करण्याचे आवाहन केले आहे.हा निर्णय केवळ आर्थिक मदत नाही, तर मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी देवस्थानांचा विश्वास आणि सामाजिक जबाबदारी याचे प्रतीक ठरला आहे. यावेळी कार्यकारी अभियंता विशाल चोपडे तहसीलदार अभिजीत जगताप उपविभागीय अभियंता डि के भिसे मुख्याधिकारी विवेक कांदे नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्यासह पत्रकार मान्यवरांची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या दौऱ्यादरम्यान सार्वजनिक बांधकाम विभाग प्रादेशिक नांदेड च्या मुख्य अभियंता श्रीमती रूपा राउळ गिरासे यांनी भेट देऊन लिफ्ट आणि स्कायवॉकच्या कामासह इतर बांधकामांची पाहणी केली.

# अनुकंपासह एम.पी.एस.सी.च्या शिफारसपात्र ३३२ उमेदवारांना मिळाली नोकरीची संधी जिल्हा प्रशासनाचा पुढाकार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : राज्य शासनाने जाहीर केलेल्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात विविध योजना व उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. शासनाने नव्याने लागू केलेल्या अनुकंपा नियुक्तीच्या सर्वसमोवशक सुधारित धोरणानुसार जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी या उपक्रमास गती दिल्याने नांदेड जिल्ह्यातून अनुकंपा तत्वावर गट 'क' संवर्गात ७० उमेदवार व गट 'ड' संवर्गात २२२ उमदेवार व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एम.पी.एस.सी.) शिफारस केलेल्या ६४ उमेदवार असे एकूण ३५६ उमेदवारांना शासकीय नोकरीची संधी मिळाली आहे. ते लवकरच आपल्या आयुष्याची नव्याने सुरूवात करणार आहेत. शनिवार ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता कुसूम सभागृह, व्ही.आय.पी.रोड, नांदेड येथे होणाऱ्या रोजगार मेळाव्यात या उमेदवारांना पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे देण्यात येणार आहेत. जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली अनुकंपा भरतीची प्रक्रिया पार पाडण्यात आली आहे. शासकीय सेवेत कार्यरत असतांना अधिकारी व कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबावर ओढवणाऱ्या आर्थिक आपत्तीतून कुटुंबीयांना सावरण्यासाठी कुटुंबातील एका सदस्यास अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत नियुक्ती देण्याचे सुधारित धोरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने पारित केले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात मागील महिन्यात झालेल्या मेळाव्यात उमदेवारांना शासन निर्णय व नियुक्ती प्रकियेबाबत मागदर्शन करण्यात आले. यात अनुकंपा तत्वावर गट-'क' पदाकरिता यादीतील ७० उमेदवारांची, तर गट-'ड' पदाकरिता २२२ उमेदवारांची नियुक्तीकरिता शिफारस करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगानेही ६४ उमेदवारांच्या नियुक्तीची शिफारस केली आहे.

# अनुकंपासह एम.पी.एस.सी.च्या शिफारसपात्र ३३२ उमेदवारांना मिळाली नोकरीची संधी जिल्हा प्रशासनाचा पुढाकार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : राज्य शासनाने जाहीर केलेल्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात विविध योजना व उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. शासनाने नव्याने लागू केलेल्या अनुकंपा नियुक्तीच्या सर्वसमोवशक सुधारित धोरणानुसार जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी या उपक्रमास गती दिल्याने नांदेड जिल्ह्यातून अनुकंपा तत्वावर गट 'क' संवर्गात ७० उमेदवार व गट 'ड' संवर्गात २२२ उमदेवार व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एम.पी.एस.सी.) शिफारस केलेल्या ६४ उमेदवार असे एकूण ३५६ उमेदवारांना शासकीय नोकरीची संधी मिळाली आहे. ते लवकरच आपल्या आयुष्याची नव्याने सुरूवात करणार आहेत. शनिवार ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता कुसूम सभागृह, व्ही.आय.पी.रोड, नांदेड येथे होणाऱ्या रोजगार मेळाव्यात या उमेदवारांना पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे देण्यात येणार आहेत. जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली अनुकंपा भरतीची प्रक्रिया पार पाडण्यात आली आहे. शासकीय सेवेत कार्यरत असतांना अधिकारी

# फैज-ए-आमचे कार्य निश्चितच अभिमानास्पद आहे.... अरविंद रायबोले

अहमदपूर: फैज-ए-आम चॅरिटेबलच्या वतीने दरवर्षी वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात येते आणि या वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून उर्दू माध्यमांच्या मुलांमुलींमध्ये स्टेज निर्माण करणे, त्यांना अभ्यासासाठी परावर्त करणे,त्यांच्यातल्या चांगल्या गोष्टींसाठी स्टेज निर्माण करणे त्याचप्रमाणे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करणे हे सर्व कार्य या ट्रस्टच्या माध्यमातून होते हे निश्चितच सध्याच्या काळामध्ये अभिमानास्पद व कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन अहमदपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांनी केले.

ते दिनांक 2 ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने सिटी प्लाझा अहमदपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या अहमदपूर व चाकूर तालुक्यातील उर्दू माध्यमांच्या प्राथमिक व माध्यमिक अशा दोन गटांमध्ये वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते यावेळी व्यासपीठावर अहमदपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी संतोष लोमटे, माजी उपनगराध्यक्ष अब्दुल मुजीब पटेल जागीरदार, सामाजिक कार्यकर्ते मोहसीन बायजीद, डॉक्टर



अब्दुल राफे, हबीब मसूद अली, अलीम इसरार, सिराज हुसेन,मुंबईचे खान अब्दुल्ला,रजाअली खान लष्करी, मिर अकबर अली, नुसरत कादरी, शेख युनुस सर, शेख मतीन सर आदींची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना अरविंद रायबोले म्हणाले की विद्यार्थ्यांमध्ये सध्या मोबाईलचे प्रमाण वाढल्यामुळे शिक्षकांवर त्याचबरोबर पालकावरही जबाबदारी वाढलेली आहे .पालक आणि शिक्षक यांच्या समन्वयातून विद्यार्थी मोबाईल पासून कसा दूर होईल व पुस्तकांशी मैत्री कशी होईल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

या वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्राथमिक गटातून केजीएन प्राथमिक शाळा अहमदपूरच्या काजी मोहियोद्दीन समीयोद्दीन प्रथम आला असून 15000 रुपये रोख, चषकव प्रमाणपत्र असे बक्षीस त्यास देण्यात आले तर याच गटात दुसरा क्रमांक सुलेमानीया प्राथमिक विद्यालय काळेगावची सय्यद इकरा सलाहोद्दीनने पटकावले असून या विद्यार्थिनी दहा हजार रुपये रोख, प्रमाणपत्र व चषक तर सुलेमानीया य प्राथमिक विद्यालय काळेगावची सय्यद बरखा जाकेर ही विद्यार्थिनी तिसऱ्या क्रमांकावर आली असून या विद्यार्थिनी पाच हजार रुपये रोख, प्रमाणपत्र व चषक तर उत्तेजनार्थ म्हणून चौथा क्रमांक प्राथमिक शाळा वडवळच्या उस्ताद जैनब शेरअली आणि पाचवे बक्षीस बागवान जैनब जाकेरअल फारूक विद्यालय नळेगाव च्या विद्यार्थिनीला असे प्रत्येकी दोन हजार रुपये रोख, प्रमाणपत्र व चषक अशा बक्षिसांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली तर माध्यमिक गटातून पि ए इनामदार हायस्कूल किनगाव ची सय्यद इनशिरा जुबेर प्रथम आल्यामुळे पंधरा हजार रुपये रोख, प्रमाणपत्र व चषक तसेच दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस अल फारूक हायस्कूल नळेगावच्या जोया उस्मान मुजावर आल्यामुळे दहा हजार रुपये रोख, प्रमाणपत्र व चषक तर तिसऱ्या क्रमांकावर एस ए जागीरदार हायस्कूल काळेगावची सय्यद सुमय्या फारुख या विद्यार्थिनीला मिळाले असून रुपये 5000 रोख, प्रमाणपत्र व चषक तर याच माध्यमिक गटातून चौथे बक्षीस हे या ए एच रिजवी हायस्कूल हाडोळतीच्या चाऊस अबूजर सालम आणि पाचवे बक्षीस उस्मानीय हायस्कूल अहमदपूरच्या बागवान ऐमन गफुर या विद्यार्थिनींना प्रत्येकी दोन हजार रुपये रोख, प्रमाणपत्र व चषक असे वाटप करण्यात आले.

तत्पूर्वी या कार्यक्रमाचे दोन भाग करण्यात आले होते पहिल्या सत्रात अर्थात सकाळच्या सत्रामध्ये इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.अहमदपूर व चाकूर तालुक्यातील १४ उर्दू शाळेतील 28 विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला या सत्राचे अध्यक्ष म्हणून व्यासपीठावर मराठवाडा साहित्य परिषदेचे कोषाध्यक्ष तथा ज्येष्ठ शिक्षक शेख जिलानी सर हे होते तर दुपारच्या सत्रामध्ये माध्यमिक गटातून दहा उर्दू शाळांनी सहभाग नोंदवला ज्यामधून वीस विद्यार्थ्यांनी भाग घेतला या दुपारच्या सत्राचे अध्यक्ष म्हणून शिक्षण महर्षी तथा माजी उपनगराध्यक्ष अब्दुल मुजिब पटेल जागीरदार हे होते. कार्यक्रमाच्या सुंदर सूत्रसंचालन रियाज निचलकर आणि रियाजोद्दीन काझी यांनी केले तर आभार अरे रियाजोद्दीन काझी यांनी मानले. कार्यक्रम माझ्या यशस्वीतेसाठी फैज ए आम चॅरिटेबल ट्रस्टच्या सभासदांनी अथक परिश्रम घेतले, यावेळी अहमदपूर व चाकूर परिसरातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

शनिवार ४ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



## पाकिस्तानातून भारतात आले, हातगाडीवर व्यवसाय सुरू केला, आज 600 कोटींचे साम्राज्य



आज आम्ही तुम्हाला 600 कोटींचे साम्राज्य उभारणाऱ्या कथुरिया कुटुंबाविषयी सांगणार आहोत. हे कुटुंब पाकिस्तानातून भारतात आले आणि ठेल्यापासून आपल्या व्यावसायाला सुरुवात केली. बघता बघता आज यशाच्या शिखराव कथुरिया कुटुंब असून त्यांचा व्यवसाय हा कोट्यवधींच्या घरात पोहोचला आहे. चला तर मग याविषयीची माहिती पुढे विस्ताराने जाणून घेऊया.

असे म्हटले जाते की जर आपण काहीही करण्याचा निर्णय घेतला तर अडचणींचा डोंगर असला तरीही काहीही कठीण राहत नाही. अशीच एक सक्सेस स्टोरी पाकिस्तानपासून भारतात आलेल्या आणि यशोशिखर गाठलेल्या कथुरिया कुटुंबाची आहे. पाकिस्तानातील मुलतान शहरात कथुरिया कुटुंबाचे मिठाईचे मोठे दुकान होते. भारत आणि पाकिस्तानच्या फाळणीच्या वेळी कथुरिया कुटुंब पाकिस्तानातून दिल्लीजवळील गुरुग्राम येथे स्थायिक झाले. यानंतर कथुरिया कुटुंबाने येथे एका हातगाडीवर व्यवसाय सुरू केला. आज हा व्यवसाय 600 कोटींवर पोहोचला आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, कथुरिया कुटुंबातील प्रकाश कथुरिया आणि पुष्पेंद्र कथुरिया यांनी गुरुग्राममध्ये गाडीवर सोहन हलव्याचा व्यवसाय सुरू केला. आज दोन्ही भावांच्या नावाचे नाणे भारतभर फिरत आहे. ओम स्वीट्स या नावाने कथुरिया कुटुंबाचा व्यवसाय आहे. कथुरिया कुटुंबाने ओम स्वीट्ससाठी सर्वात खास डेझर्ट बनलेली दादी बर्फी बनवली होती.

दिल्ली-एनसीआरमध्ये कथुरिया कुटुंबाची अनेक दुकाने आज दिल्ली-एनसीआरमध्ये कथुरिया कुटुंबाची 20 हून अधिक दुकाने आहेत. हे घराणे 'डोडा बर्फी'चा राजा झाला. कथुरिया कुटुंब स्वातंत्र्यापूर्वी मुलतानमध्ये सोहण हलवा बनवून आपली उपजीविका करत होते. त्याच्याकडे हेच एकमेव कौशल्य होते आणि त्याने त्याचा मनापासून सन्मान केला. 1947 मध्ये फाळणीनंतर या कुटुंबाला भारतात यावे लागले. गुरुग्रामच्या अर्जुन नगरमध्ये त्यांनी एक छोटी सोहन हलवा गाडी सुरू केली.

ओम प्रकाश यांनी पदभार स्वीकारला

दरम्यान, कुटुंबाच्या प्रमुखाचे निधन झाल्यावर ओमप्रकाश यांनी आपले शिक्षण सोडून गाडीचा व्यवसाय हाती घेतला. त्यांच्या मेहनतीने त्या गाडीचे एका छोट्या दुकानात रूपांतर झाले, जे हळूहळू मोठे नाव झाले. आज, ओम स्वीट्सच्या मेनूमध्ये 600 हून अधिक वस्तू आहेत. यामध्ये कुरकुरीत डोसा, मसालेदार चाऊमीन, रसाळ रसमलाई आणि विशेष म्हणजे त्यांचा 'डोडा बर्फी' यांचा समावेश आहे. ही बर्फी लोकांसाठी केवळ गोड नाही तर एक भावना आहे. यात एक खास 'अंगूरी गहू' वापरला जातो, जो त्याला एक आगळी चव देतो. दररोज 10,000 किलो बर्फी विकली जाते आणि सणासुदीच्या काळात हा आकडा पाचपट वाढतो. लोक त्याच्या गोडपणाचे वेडे झाले आहेत.

## दत्तकृपा इलेक्ट्रिक स्कूटर सेल्स अँड सर्व्हिसचे आ.भीमराव केराम यांच्या हस्ते उद्घाटन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : विजयादशमी व दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर किनवट शहरात प्रथमच दत्तकृपा इलेक्ट्रिक स्कूटर सेल्स अँड सर्व्हिसचे आमदार भीमराव केराम ह भ प साईनाथ महाराज वसमतकर यांच्या शुभहस्ते उद्घाटन संपन्न झाले. माजी उपसभापती गजानन पाटील कोल्हे यांच्या संकल्पनेतून प्रदीप कोल्हे,आकाश इंगोले या नवंउद्योजक युवकांनी किनवट शहरात प्रथमच प्रदूषण मुक्त इलेक्ट्रिक स्कूटरची सेवा आपल्या ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिली आहे.सध्या इंधन दरात प्रचंड महागाई वाढली असून पेट्रोल डिझेलचे भाव गगनाला भिडले आहेत, त्यातच वेगवेगळ्या वाहनांच्या दूषित प्रदूषणामुळे आणि कर्कस आवाजामुळे माणूस प्रचंड अस्वस्थ आहे, तर आता या सर्व बाबींपासून मुक्तता मिळविण्यासाठी प्रदूषणमुक्त इलेक्ट्रिक



स्कूटर घेण्यावरच नागरिकांनी पसंती दर्शवत आहेत.आजच्या या उद्घाटनाप्रसंगी अनेक नागरिकांनी या इलेक्ट्रिक बाइकला पसंती दिली असून या नवयुवक व्यावसायिकांचं सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. उद्घाटनाप्रसंगी आमदार भीमराव केराम यांनी उपसभापती गजानन पाटील कोल्हे यांच्या संकल्पनेतून आकाश इंगोले आणि प्रदीप कोल्हे यांनी उभारलेल्या व्यवसायासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.यावेळी सर्व उपस्थितांचे माजी उपसभापती गजानन पाटील कोल्हे,संदीप कोल्हे यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत विजयादशमी व दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती राजू पाटील सोळंके,वैजनाथ करपुडे पाटील, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार,अनिल पाटील कराळे अजय चाडावार, बालाजी मुरकुटे, श्रीनिवास नेम्मानिवार, दत्ता आडे, मारोती दिवसे पाटील शिवराज राघू ,स्वागत आयनेनीवार,उमाकांत कराळे पत्रकार संघटनेचे जिल्हा संघटक प्रदीप वाकोडीकर ज्येष्ठ पत्रकार फुलाजी गरड पाटील पत्रकार संघटनेचे तालुका अध्यक्ष प्रमोद पोहरकर तालुका सचिव बालाजी सिरसाट, माधव सूर्यवंशी,बालाजी बामणे, अमरदीप कदम,डॉ. सतिश सोरटे,मारोती भरकड, राजू सुरोशे, बाळकृष्ण कदम बाळू पवार, अतुल दर्शनवाड सचिन कदम,प्रशांत मोरे, रितेश मंत्री,विक्रम पवार,सुमित माने,किशन मुंगल,विशाल शिंदे, अवधूत कदम, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर पत्रकार बांधव उपस्थित होते.

## शासनाकडून शेतकऱ्यांना मिळालेली मदत कर्ज खात्यात वळती करु नये : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : जिल्ह्यात ज्या शेतकऱ्यांच्या खात्यावर शासनाकडून मदतीची रक्कम जमा करण्यात आली आहे त्या शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झालेली मदतीची रक्कम बँकांनी कर्ज खात्यात अथवा इतर वसुलीसाठी वळती करु नये, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्हा अग्रणी बँक व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना दिले आहेत. नांदेड जिल्ह्यात ऑगस्ट २०२५ मध्ये अतिवृष्टी व पुर यामुळे ७ लाख ७४ हजार ३१३ इतक्या शेतकऱ्यांचे ६,४८,५३३.२१



हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते. त्याअनुषंगाने जिल्हा प्रशासनाचे अहवालावरुन शासनाने एकूण ५५३.३४ कोटी रुपये मदत निधी जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी मंजुर केला आहे. ही मंजुर रक्कम बाधित शेतकऱ्यांना ऑनलाईन प्रणालीद्वारे वाटप करण्यात येत आहे. आता पर्यंत जिल्ह्यातील ४,८२,६७४ इतक्या शेतकऱ्यांना ३६२.०३ कोटी इतक्या रकमेचे वाटप करण्यासाठीची माहिती ऑनलाईन प्रणालीवर संबंधीत तहसील कार्यालयातून भरण्यात आली आहे. उर्वरीत शेतकरी यांची माहिती संगणकीय प्रणालीवर भरण्याची कार्यवाही सुरु आहे. माहिती भरण्यात आलेल्या शेतकऱ्यांचे वि.के. नंबर त्या गावच्या तलाठी यांच्यमार्फत गावात प्रसिध्द करण्यात आले आहेत. या वि.के. नंबरद्वारे सेतू सुविधा केंद्रावर जाऊन ई-केवायसी पूर्ण करणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट मदतीची रक्कम डिबीटी पध्दतीने शासनामार्फत जमा होत आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

## शाळा, क्लासेस चालकांना पूरग्रस्तांच्या मदतीची संधी - संस्था चालकांनो गोरगरीब विद्यार्थ्यांची फीस माफ करणार का ?

गेवराई दि. 3 : वार्ताहर : गेवराई तालुक्यातील विविध भागाला गोदावरी, सिंदफणा नदीच्या पुराचा मोठा फटका बसला असून, तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. अस्मानी संकटाने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना आणि त्यांच्या पाल्यांना शाळा संस्था चालकांनी मोठे मन दाखवून, या वर्षीची शालेय फीस पूर्णत: माफ करावी, अशी माफक अपेक्षा, पालकांनी व्यक्त केली आहे.

गेवराई मतदारसंघात पडलेल्या मुसळधार पावसाने शेत पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शेती खरडून गेली आहे. गेवराई तालुक्यातील गोदाकाठ व सिंदफणेच्या काठावरची गावे,



शेती पुराच्या पाण्यात गेल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. अनेकांचे संसार उघडय़ावर आलेत. त्यामुळे, हे नुकसान भरून निघणारे नाही. खरीप हंगामातील पीके पूर्ण पणे पाण्यात गेल्याने, मोठा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्याची गरज असून, गेवराई तालुक्यावर खाजगी शाळा, कोचिंग क्लासेस च्या संचालकांनी बांधिलकीतून स्वत:च पुढे यावे आणि विद्यार्थ्यांची या वर्षीची शालेय फीस संदर्भात सकारात्मक विचार करावा. गेवराई तालुक्यात गोदावरी, सिंदफणा नदीच्या पुराचा मोठा फटका बसला आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. अस्मानी संकटाने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना आणि त्यांच्या पाल्यांना शाळा संस्था चालकांनी मोठे मन दाखवून, या वर्षीची शालेय फीस पूर्णत: माफ करावी, अशी माफक अपेक्षा, पालकांनी व्यक्त केली आहे.

## मृत्यूच्या दारातून एका लहान मुलाला नवे जीवन जीवदान दिल्याबद्दल मुसाखान यांचा सत्कार

बीड प्रतिनिधी बीड शहरातील चांदणी चौक परिसरात घडलेली एक घटना संपूर्ण शहराला भावूक करून गेली होती. शहरातील प्रसिद्ध समाजसेवक व भाजप नेते मुसाखान, नेहमीच्या कार्यात व्यस्त असतानाच अचानक त्यांना हृदय हेलावून टाकणारी घटना दिसली. दगडी छोट्या पुलावरून एक लहान मुलगा



घसरून पाण्यात कोसळला आणि त्याच्या डोळ्यांसमोर मृत्यूचा महाभयंकर खेळ उभा राहिला.पाणी खोल होते, प्रवाहही तीव्र होता. छोटा मुलगा जीव वाचवण्यासाठी तडफडत होता. त्या क्षणी कुणीही पुढे सरसावणे म्हणजे स्वतःच्या जीवाशी खेळणे होते. याचवेळी मुसाखान यांनी त्या वाचवणाऱ्या मुलांसह त्या मुलाला वाचवलं याच कारणाने एम के ग्रुप च्या वतीने त्यांना शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी एम के ग्रुपचे मकसूद खान, बीड प्रसार चे संपादक समीर काझी, इसाक सर, रिजवान लाला, आमेर खान, शहाजमा खान, शाहिद खान. कबीर दादा. बुरहान काझी आदी उपस्थित होते.

## बीड जिल्हास्तरीय रायफल शुटिंग स्पर्धेतचि. तानाजी काळे याने पटकावला प्रथम क्रमांक सर्वस्तरातून होतोय अभिनंदनाचा वर्षाव..!

बीड दि.२०(प्रतिनिधी)-बीड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या बीड जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत 10 मीटर (वय गट:17) शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थी तानाजी काळे याने यशस्वी कामगिरी करून प्रथम क्रमांक मिळवत श्री महालक्ष्मी विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. चि. तानाजी काळे याच्या या उज्वल यशाबद्दल त्याच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. 4 ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

बीड शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी तानाजी सुभाष काळे या विद्यार्थ्यांस पिस्तोल शुटिंगची लहानपणापासून आवड आहे. ही आवड जोपासण्यासाठी तो सातत्याने धडपड करत आहे. तो दररोज सराव करून या स्पर्धेत अधिक निपुण होण्यासाठी तो प्रयत्नशील असतो. त्याने आता पर्यंत विविध स्पर्धासह शालेय स्तरावरील स्पर्धेत तालुका, जिल्हा आणि विभागीय स्तरावर पिस्तोल शुटिंग स्पर्धेत भाग घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. काल बुधवार दिनांक 01 ऑक्टोबर रोजी बीड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने जिल्हास्तरीय रायफल शुटिंग स्पर्धा 10 मीटर (वय गट:17) बलभीम महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी चि. तानाजी सुभाष काळे सहभागी झाला होता. या स्पर्धेत त्याने प्रथम क्रमांक मिळून त्याने श्री महालक्ष्मी विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. त्याच्या या यशाबद्दल त्याचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष गणेश वाघ सर, सचिव नामदेव वाघ सर, लेक लाडकी अभियानाचे

**श्री महालक्ष्मी विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा!**



बाजीराव ढाकणे, गावातील प्रतिष्ठित नागरिक राजेश भाऊ देवकते, संतोष नरवडे, त्याचे वडील सुभाष काळे, शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय चव्हाण सर, आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे, श्रीमती साळुंके, श्रीमती सानप मॅडम यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह, नातेवाईक आणि मित्र परिवारांनी त्याचे अभिनंदन करून त्यास पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. येत्या 4 ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

शनिवार ४ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



# दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत करा, नाहीतर... जरांगे पाटलांचा सरकारला अल्टिमेटम

मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य न केल्यास गंभीर परिणामांचा इशारा दिला आहे. शेतकऱ्यांना मदत न केल्यास राज्यात कोणत्याही राजकीय नेत्याला फिरू दिले जाणार नाही, असे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या पूर्ण करणे आवश्यक असून, यात शेतीला नोकरीचा दर्जा देणे आणि शेतीमालाला हमीभाव देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जरांगे पाटील यांनी ही लढाई अत्यंत टोकाची आणि मोठी असल्याचे सांगितले. पुढे जरांगे म्हणाले की, आतापर्यंतच्या दोनशे-चारशे वर्षांत शेतकऱ्यांना मिळाला नसेल, असा मोठा न्याय मिळवून देण्याचा त्यांचा निर्धार आहे. या लढ्यात प्रत्येक घरातून एक-दोन शेतकऱ्यांनी कायम साथ देण्याचे आवाहन त्यांनी केले. जर दिवाळीपर्यंत शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर त्यानंतर राज्यव्यापी बैठक घेऊन सरकारला निवडणुका आणि सभा घेऊ दिल्या जाणार नाहीत. प्रसंगी महाराष्ट्रात कोणत्याही राजकीय नेत्याला राहू दिले जाणार नाही, असा सज्जड इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे.



## शहाणपणा करायचा नाही, मागचं पुढचं सगळं काढेन... मराठा आरक्षणावरून जरांगेंचा मुंडेंना थेट इशारा

मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य न केल्यास गंभीर परिणामांचा इशारा दिला आहे. शेतकऱ्यांना मदत न केल्यास राज्यात कोणत्याही राजकीय नेत्याला फिरू दिले जाणार नाही, असे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या पूर्ण करणे आवश्यक असून, यात शेतीला नोकरीचा दर्जा देणे आणि शेतीमालाला हमीभाव देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जरांगे पाटील यांनी ही लढाई अत्यंत टोकाची आणि मोठी असल्याचे सांगितले.पुढे जरांगे म्हणाले की, आतापर्यंतच्या दोनशे-चारशे वर्षांत शेतकऱ्यांना मिळाला नसेल, असा मोठा न्याय मिळवून देण्याचा त्यांचा निर्धार आहे. या लढ्यात प्रत्येक घरातून एक-दोन शेतकऱ्यांनी कायम साथ देण्याचे आवाहन त्यांनी केले. जर दिवाळीपर्यंत शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर त्यानंतर राज्यव्यापी बैठक घेऊन सरकारला निवडणुका आणि सभा घेऊ दिल्या जाणार नाहीत. प्रसंगी महाराष्ट्रात कोणत्याही राजकीय नेत्याला राहू दिले जाणार नाही, असा सज्जड इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे. दसरा मेळाव्यात धनंजय मुंडे यांनी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यास विरोध केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. जरांगे पाटील यांनी मुंडेंना रक्तानं हात भरलेत, माझ्या नादी लागू नये असा इशारा दिला. तसेच, मुंडे बंधू-भगिनींनी मराठा आरक्षणाला विरोध केल्यास त्यांचे राजकीय नामोनिशाण मिटवू, असा दमही भरला आहे.


# चकलांबा परिसर पुन्हा एकदा गूढ आवाजाने हादरले हाआवाज कशाचा प्रशासनाने याची दखल घ्यावी

**पत्रकाराने माहिती देण्यासाठी फोन लावला असताना तहसीलदार खोमणे हे पत्रकाराचे फोन उचलत नाही तरी जिल्हा प्रशासने याची दखल घ्यावी व आवाज कशाचे याचा शोध लावा पत्रकार असलम कादरी : नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण सामाजिक कार्यकर्ते कृष्णा खेडकर**

चकलांबा प्रतिनिधी :- गेवराई तालुक्यातील चकलंबा सर्कलचे गाव असलेल्या चकलंबा परिसरात मंगळवारी दुपारी २ वाजून ५०मिनिटांनी अचानक मोठा आवाज झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते त्याच सारखे पुन्हा शुक्रवारी १० वाजून ४ मिनिटाने आवाज झाला आवाज नेमका कशाने झाला हे मात्र समजू शकले नाही. हा आवाज चकलांबा परिसरातील आसपासच्या गावात अंतरापर्यंत ऐकायला मिळाल्याचे नागरिकांनी सांगितले अचानक मोठा आवाज व हादरा बसल्याने भीतीपोटी नागरिक घराबाहेर पळाले व आज शुक्रवार रोजी१०:४मी पुन्हाआवाज झाल्याने गावामध्ये लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी प्रशासनाने याची दखल घ्यावी आणि हा आवाज कशाचा याचा शोध लावा परिसरातील अनेक गावात हा गूढ आवाज झाला. याप्रकरणी पत्रकार यांनी तहसीलदार संदीप खोमणे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी फोन उचलला नाही तहसीलदार खोमणे साहेब कोणाचे फोन उचलत नाही मग हे माहिती द्यायची कोणाला मग पत्रकाराने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग बीड यांना या आधी ३० सप्टेंबर रोजी या गूढ आवाजा विषयी माहिती दिली आणि ३ ऑक्टोबर रोजी ही माहिती दिली आहे.



## वेदनांनी घेरलेल्या कुटुंबाला डीयमचा आधार..!



बीड - पत्रकार देवेंद्रसिंह ढाका यांच्या २० वर्षीय यश नावाच्या मुलाची बीडच्या गजबजनाऱ्या चौकात निर्घुण अशी हत्या करण्यात आली. काल आमदार धनंजय मुंडे साहेबांनी ढाका परिवाराला भेट देऊन सांत्वन केले. सांत्वन भेटीदरम्यान उपस्थितांनी दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण करून कुटुंबाला मानसिक धीर देण्याचा प्रयत्न केला. या प्रसंगी सहकारी अविनाश नाईकवाडे , ओबीसी सेलचे अध्यक्ष कल्याण आखाडे, राष्ट्रवादी पक्षाचे प्रवक्ते भागवत तावरे, शहरातील नागरिक, नातेवाईक व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गांधीच्या विचारांचा भारत देश हवा – अलीम सय्यद



बीड : आजच्या वेगवान काळात हिंसा, भ्रष्टाचार, स्वार्थी राजकारण आणि जातीयतेच्या विळख्यात अडकलेल्या समाजाला गांधींच्या विचारांचा आधार हवा आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.. महात्मा गांधींनी दिलेला सत्य, अहिंसा, प्रामाणिकपणा आणि ग्रामस्वराज्याचा संदेश आज अधिक महत्त्वाचा ठरतो आहे.गेल्या काही दिवसांपासून वाढलेली असहिष्णुता, तरुणांमध्ये वाढत असलेली दिशाहीनता आणि नफेखोरीची स्पर्धा पाहता गांधींच्या विचारांनीच समाजाला योग्य दिशा मिळू शकते, असे मत त्यांनी मांडले.भारताला खऱ्या अर्थाने प्रगती करायची असेल, तर गांधीजींचा विचार व्यवहारात आणला पाहिजे. अन्यथा विकास फक्त कागदावर राहील,असे मत व्यक्त करण्यात आले.ग्रामपातळीवर आत्मनिर्भरतेचा मार्ग, स्वच्छता, समानतेवर आधारित समाजरचना, सर्व धर्मांचा आदर आणि हिंसेला ठाम नकार हे गांधींचे तत्त्व आजच्या भारताला मार्गदर्शक ठरू शकतात असे मत यावेळी यांनी व्यक्त केली.

# माजलगावातील शुक्ल तीर्थ लिमगाव ह्या गावातील २००६ पासून गावातील नागरिक ह्या मुख्य रस्त्यावरच्या पुलाची मागणी

माजलगावातील शुक्ल तीर्थ लिमगाव ह्या गावातील २००६ पासून गावातील नागरिक ह्या मुख्य रस्त्यावरच्या पुलाची मागणी खासदार व आमदार यांच्याकडे करीत आहेत पण त्याच्याकडे आतापर्यंत कुणीही लक्ष दिलेलं नाही २००६ पासून आपल्या जिल्ह्याच्या लाडक्या खासदार प्रीतम ताई मुंडे यांनी देखील पुलाची पाहणी करून गावातील नागरिकांना आश्वासन दिलं होतं त्यांनी सुद्धा दुर्लक्ष केलेला आहे आणि माजलगाव चे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी सुद्धा दोन ते तीन वेळेस पाहणी करून



यांनी देखील काहीही केलेलं नाही मग नागरिकांचा सवाल आहे की तुम्ही नुसतं मतदानापुरतच गावात येतात का आता पंधरा ते वीस दिवसापासून लिमगाव चा मुख्य रस्त्यावर जो पूल आहे त्याच्यावर पंधरा ते वीस फूट पाणी आहे गावकऱ्यांचे म्हणणं आहे की रनिंग खासदार असतील किंवा आमदार असतील यांनी त्वरीत लक्ष देऊन काम मार्गी लावावे अन्यथा इथून पुढच्या काळात लोकसभा असेल किंवा विधानसभा गावातील येण्यास सक्त मनाई केली जाईल पुलाचं काम मार्गी लावल्याशिवाय गावात येऊच देणार नाहीत भाई मुंजा पांचाळ माजलगाव तालुका चिटणीस शेकापभाई मुंजा पांचाळ भाई विष्णू शेळके लक्ष्मण आप्पा चव्हाण भाई राजेभाऊ शेरकर भाई साळूजी हांडे भाई भास्कर कांबळे हर्षल वगैरे बाबा वगैरे भाई मुकेश शेरकर आत्तम शेरकर अभिमान शेरकर वैभव वगैरे पिंटू वगैरे नवनाथ कांबळे दत्ता शेरकर पाराजी हांडे अविनाश हांडे बाबू हांडे रत्नेश्वर हांडे आनंत चव्हाण रामेश्वर शिंगाडे सचिन वगैरे आदित्य हांडे योगेश चव्हाण सखाराम बांनईत विकास शेरकर शाहू हांडे स्वप्निल वगैरे अनिल

# बीड बसस्थानकासमोर पोलिस अधिकाऱ्याच्या गाडीत महिला; पतीने रंगेहात पकडल्याने गोंधळ

बीड (दि. 3 ऑक्टोबर) : बीड बसस्थानकासमोर आज दुपारी मोठा गोंधळ उडाला. एका पोलिस अधिकाऱ्याच्या चारचाकी वाहनात एक महिला सापडल्याने तिच्या पतीने वाहन अडवून संताप व्यक्त केला. प्राथमिक माहितीनुसार, संबंधित महिला काही महिन्यांपासून त्या पोलिस अधिकाऱ्याच्या संपर्कात असल्याची शंका पतीला होती. त्यामुळे तो पत्नीच्या हालचालींवर लक्ष ठेवून होता. आज दुपारी पत्नी पोलिस अधिकाऱ्याच्या गाडीत बसताना दिसताच पतीने वाहन अडवले व बसस्थानकासमोर चांगलाच राडा घातला.चारचाकी वाहन क्रमांक MH23BC 3402 यामध्ये बसून पत्नी बीड सहारा बाहेर जात असल्याची माहिती मिळताच पतीने स्थानकासमोर चार चाकी अडवून ठेवत संताप व्यक्त केला. तो पोलीस अधिकारी गाडी अडवल्यानंतर जमावाचे अंगावर गाडी घालत असल्याची माहिती मिळत आहे. या घटनेमुळे काही वेळ बसस्थानक परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. संबंधित पोलिस अधिकारी यापूर्वीही वादग्रस्त ठरला असून त्याच्यावर गुन्हा दाखल असल्याची




माहिती समोर येत आहे. बस स्थानकासमोर गोंधळ वाढू नये म्हणून पोलिसांनी तो अधिकारी व त्या महिलेला तातडीने शिवाजीनगर पोलिस ठाण्यात आणले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिस ठाण्यात मोठी गर्दी जमली होती. पुढील कारवाई सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## DPS इंग्लिश स्कूलच्या प्रिन्सिपल"अरोरा"यांनी राजीनामा दिल्याने विद्यार्थ्यांचे शाळेतच आंदोलन पहा

बीड :प्रतिनिधी शहरातील बार्शी रोडवरील असलेली श्री संत ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूल ही काही वर्षात नावारूपाला आली होती. परंतु मागील काही महिन्यात या शाळेतील संस्थापक पवार यांच्यावर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याने याची चर्चा जिल्हाभर पसरली होती. हा गुन्हा जाणीवपूर्वक दाखल करण्यात आल्याची चर्चा होती.

शहरातील श्री संत ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूलमध्ये प्रिन्सिपल मॅडम अरोरा यांनी दोन दिवसांपूर्वी दिलेल्या राजीनाम्याच्या निषेधार्थ आज विद्यार्थ्यांनी वर्गाबाहेर बसून आंदोलन करत घोषणा दिल्याने शाळेत एकच गोंधळ उडाला. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी"we want principal" अशा घोषणा देत मॅडम अरोरा यांनी राजीनामा परत घेऊन शाळेत रुजू व्हावे, अशी मागणी केली. अचानक आंदोलन सुरू झाल्याने शाळेतील शिक्षकांची एकच धावपळ उडाली. विद्यार्थ्यांना घेण्यासाठी पालक काम सोडून शाळेकडे धावले, यामुळे परिसरात मोठी गर्दी झाली. प्रिन्सिपल मॅडम यांनी दबावाखाली की स्वखुशीने शाळा सोडली, याची अधिकृत माहिती मिळू शकली नाही. जवळपास तीन तास आंदोलन सुरू असतानाही शिक्षण विभाग वा पोलीस प्रशासनाचा एकही कर्मचारी घटनास्थळी आला नाही, ही बाब चर्चेचा विषय ठरली आहे. प्रिन्सिपल अरोरा मॅडम यांनी व्हिडिओ कॉल करून विद्यार्थी संवाद साधल्यानंतर विद्यार्थी शांत झाले होते. अरोरा यांनी राजीनामा का दिला याचे कारण मात्र अद्याप अस्पष्ट आहे. या आंदोलनामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असून, शाळेचे संस्थापक पवार बाहेरगावी असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com